**महाराष्ट्र शासन**

**वनार्टी इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), महाराष्ट्र राज्य,**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - 440022**

**Website :** www.vanarti.in **CIN: U84120MH2026NPL466492** **ईमेल-** : vanarti.info@gmail.com

जा.क्र.वनार्टी/आस्था/परिपत्रक/929/2026-27 दि. 17/09/2026

**-: परिपत्रक :-**

**विषय :- वनार्टी मार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) राज्यसेवा मुख्य परीक्षा - 2025 उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मुलाखत परीक्षेसाठी अर्थसहाय्य योजनेकरीता पात्र व अर्जात त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांची यादी वनार्टीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेबाबत.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या **महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) राज्यसेवा मुख्य परीक्षा-2025** मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मुलाखत परीक्षेसाठी **वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर** यांचेमार्फत अर्थसहाय्य प्रदान करण्याच्या उद्देशाने ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. सदर योजनेअंतर्गत **दि. 10/08/2026 रोजीपर्यंत एकूण 27 अर्ज** वनार्टीच्या संकेतस्थळावर प्राप्त झाले होते.

त्यानुसार अर्जांची **MPSC ने जाहीर केलेल्या निकालानुसार तसेच वनार्टी कार्यालयाच्या विहित अटी व शर्तीनुसार** छाननी करण्यात आली. प्राप्त एकूण 27 अर्जांपैकी **12 विद्यार्थ्यांचे अर्ज सदर अर्थसहाय्य योजनेसाठी पात्र** ठरले असून, **15 विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये त्रुटी आढळून** आलेली **आहे.** अर्जांमध्ये आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांना **दि. 22/09/2026 पर्यंत मुदत** देण्यात येत आहे. त्यानुसार, अर्थसहाय्य योजनेसाठी पात्र ठरलेल्या तसेच अर्जामध्ये त्रुटी आढळलेल्या विद्यार्थ्यांची यादी **वनार्टीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.**

सदर यादीतील सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी व अर्जांमध्ये आढळून आलेल्या त्रुटींची विहित मुदतीत पूर्तता करावी.

**स्वा.**

**(प्रशांत वावगे)**

**व्यवस्थापकीय संचालक (प्र.)**

वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था

(वनार्टी), नागपूर